# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

## प्रेसनोट

**2021**

**पो.मुख्यालय, नवी मुंबई** दिनांक ११.०८.२०२१

# प्रसिध्दिपत्रक

---

पोलीस भरती– २०१९ मधील विविध पदांसाठी आवेदन केलेल्या उमेदवारांना कळविण्यात येत की, दि.३०.०७.२०२१ रोजी हया कार्यालयातर्फे शुध्दीपत्रक देण्यात आले आहे. त्यामध्ये उमेदवारांना त्यांचा पासवर्ड व विकल्प निवडण्याबाबत कळविण्यात आले होते. सर्व उमेदवारांना पासवर्ड बदलणे अनिवार्य आहे. अन्यथा ते पुढील भरती प्रक्रियेत आपले आवेदन पत्र उघडु शकणार नाहीत. तसेच एसईबीसीच्या उमेदवारांना "अराखीव (खुला)" किंवा "ईडब्ल्युएस" यापैकी एक विकल्प देणे गरजेचे आहे. परंतु काही उमेदवार त्यांचा ईमेल आयडी विसरलेले आहेत किंवा अन्य कारणास्तव ईमेल आयडी हरविलेला आहे, अशा प्रकारच्या तक्रारी काही उमेदवारांकडुन प्राप्त झालेल्या आहेत.

त्या अनुषंगाने पुन:श्च असे कळविण्यात येते की, जे उमेदवार त्यांचा ईमेल आयडी विसरलेले असतील / लक्षात नसेल किंवा अन्य कारणास्तव उपलब्ध नसेले, तर त्यांचा ईमेल अपडेट करण्यासाठी तसेच विकल्प देण्यासाठी सर्व उमेदवारांना **दि.२२.०८.२०२१ चे२४.००**वाजे पर्यंत मुदत वाढवुन देण्यात येत आहे. उमेदवारांनी www.mahapolic.gov.in हया संकेतस्थळावर जाउन "पोलीस कॉर्नर " या बटन ला क्लिक करुन "**पोलीस भरती २०१९**" येथे क्लिक करावे. **नवी मुंबई** घटकाच्या संकेतस्थळावर जाउन विकल्प द्यावा. अथवा ईमेल आयडी / पासवर्ड बदल करुन घ्यावा.

★★★★★★★★★★